स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )
अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित
तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी
२०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी
देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१९/प्र.क्र.५९१/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १९ ऑगस्ट, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :- गंगा एज्युकेशन सोसायटी ,शिरुर,जि.पुणे संचलित ज्ञानगंगा इंटरनॅशनल स्कुल ,गट नं.७७९,तारडोबाचीवाडी,शिरुर,ता.शिरुर,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत गंगा एज्युकेशन सोसायटी,शिरुर,जि.पुणे संचलित ज्ञानगंगा इंटरनॅशनल स्कुल, गट नं.७७९, तारडोबाचीवाडी, शिरुर,ता.शिरुर, जि.पुणे या नवीन प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस ( इ. १ ली ते १२ वी , इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई. ), सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा स्थापन करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ <u>अटी व शर्ती-</u>

१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक **महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच <u>**रद्दबातल**</u> ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **सी.बी.एस.ई मंडळाशी संलग्नते करिता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / जिल्हा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.)

प्रमाणपत्र देईल.

३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

६) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

True Copy

[signature] १३/१०/२३

कार्यासन अधिकारी
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन
मुंबई - ४००:०३२.

[signature] ०५.०८.२०१४

(रा.वि.कुडले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)जि.प. पुणे
७. निवड नस्ती (एसएम-२).

# महाराष्ट्र शासन

ई-मेल : sm२.sesd-mh@nic.in

क्र. एमआयएस-४७१९/प्र.क्र.१७/एसएम-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३०.७.२०१९

प्रति,

आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय :-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा /दर्जावाढ करण्यास प्रस्ताव सादर करणेबाबत...
**गंगा एज्युकेशन सोसायटी, शिरुर, जि. पुणे संचलित ज्ञानगंगा इंटरनॅशनल स्कुल, मौजे शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१७/ प्र.क्र. १४२/ एसएम-२,दि. १४.०७.२०१७
२) मा. श्री. बाबुराव पाचर्णे, विधानसभा सदस्य यांचे दि. २५.७.२०१९ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडून पाठवित आहे.

२. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम,२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करण्यास / विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबत अधिनियमांतर्गत तरतुद करण्यात आली आहे. प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची तपासणी करावी :-

१) संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या शाळांच्या ३ कि.मी. ते ५ कि.मी परिसरात सुरू असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांबाबतची माहिती. (अनुदानित / विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित इ.)

२) सदर परिसरामध्ये अनुदानित शाळा असल्यास, या शाळांमधील विद्यार्थी संख्या व शिक्षक संख्या याबाबतची सविस्तर माहिती.

३. सदर प्रकरणी उपरोक्त मुद्यांसह शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे तपासणी करुन आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व शिफारशीसह संदर्भ क्र. (१) अन्वये शासनास अहवाल सादर करावा. ही विनंती.

सहपत्र:- वरीलप्रमाणे

30.07

(रा.वि.कुडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,**

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.

महाराष्ट्र शासन

क्र. एमआयएस -४७१७/प्र.क्र.१६/एसएम-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४/१०/२०१८.

प्रति,

शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक),
पुणे.

विषय :- स्वयं अर्थसहाय्य तत्वावर प्रस्ताव सादर करणे बाबत...
गंगा एज्युकेशन सोसायटी शिरुर संचलित ज्ञानगंगा इंटरनॅशनल स्कुल या शाळेस इयत्ता १ ली ते १२ वी मंजुरी करण्यास मान्यता देण्याबाबत.

संदर्भ:- श्री.बाबुराव पाचर्णे,वि.स.स यांच्या दिनांक २१/७/२०१८ पत्रावर मा.मंत्री महोदयाचे निर्देश.

वरील विषयाचे संदर्भाधीन पत्र पुढील आवश्यक व उचित कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठवित आहे. आपणास विनंती करण्यात येते की, सदर प्रकरणी शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे तपासणी करावी व शाळेचा प्रस्ताव तात्काळ शासनास स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करावा, ही विनंती.

ई मेल :- sm२.sesd-mh@gov.in

०४.१०.२०१८

(रा.वि.कुडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित
विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे
शिक्षणाधिकारी,जि.प.(प्राथमिक / माध्यमिक) पुणे ,
कार्यासन एसएम-२ (संग्रहार्थ)